# दबंग दिल्लीची पीकेएलच्या अंतिम फेरीत धडक! टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनवर मिळवला विजय

दिल्ली, २७ ऑक्टोबर २०२५: प्रो कबड्डीच्या १२ व्या हंगामातील क्वालिफायर १ चा सामना पुणेरी पलटन आणि दबंग दिल्ली के.सी. या दोन्ही संघांमध्ये पार पडला. याआधी हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते, त्यावेळी टाय ब्रेकरमध्ये निकाल लागला होता. हा सामना देखील ३४- ३४ ने बरोबरीत राहिला. त्यामुळे तिसऱ्यांदा टाय ब्रेकरमध्ये निकाल लागला. शेवटी दबंग दिल्लीने ६- ४ ने बाजी मारून अंतिम फेरीत प्रवेश केला. तर पुणेरी पलटनला अंतिम सामन्यात जाण्याची आणखी एक संधी मिळणार आहे.

त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पुणेरी पलटनकडून आदित्य शिंदेने आपलं सुपर १० पूर्ण केलं. तर पंकज मोहितेने ५ गुण कमावले. तर दबंग दिल्लीकडून नीरज नरवालने ७ आणि आशू मलिकने ४ गुण कमावले.

या सामन्यात अस्लम इनामदार पुणेरी पलटनकडून पहिली चढाई करण्यासाठी आला. पण पहिल्याच त्याची पकड करत दबंग दिल्लीने आपलं खातं उघडलं. त्यानंतर पुणेरी पलटनने पकड करून आपलं खातं उघडलं. पूर्वार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दबंग दिल्लीकडे ४-१ गुणांसह ३ गुणांची आघाडी होती. पुणेरी पलटनचा संघ सुरुवातीच्या १० मिनिटात आघाडी घेण्यासाठी ओळखला जातो. या सामन्यातही पुणेरी पलटनने पुनरागमन केलं. पण दिल्लीचा संघ ७-६ गुणांसह १ गुणाने आघाडीवर राहिला.

पूर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात दबंग दिल्लीकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. दरम्यान १६ व्या मिनिटाला पुणेरी पलटनला पहिला मोठा धक्का बसला. पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह दबंग दिल्लीने १३-७ गुणांसह ६ गुणांनी आघाडी घेतली. पण शेवटच्या काही मिनिटांमध्ये पुणेरी पलटनने दबंग दिल्लीला धक्का दिला. दबंग दिल्लीचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने १६-१६ गुणसंख्या बरोबरीत आणली. पूर्वार्धातील शेवटच्या चढाईत दबंग दिल्लीने पंकज मोहितेची पकड केली. यासह दबंग दिल्लीने १८- १७ गुणांसह एका गुणाने आघाडी घेतली.

सुरुवातीच्या २० मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. दबंग दिल्लीकडे अवघ्या एका गुणाची आघाडी होती. उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ २०- २० ने बरोबरीत

होते. उत्तरार्धातील १० व्या मिनिटाला पुणेरी पलटनने दबंग दिल्लीला दुसऱ्यांदा ऑलआऊट केलं. यासह २८-२३ गुणांसह ५ गुणांची आघाडी घेतली.

शेवटची ३ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ३२-२८ गुणांसह ४ गुणांची आघाडी होती. शेवटची दीड मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनचा संघ ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनकडे ३४-३३ गुणांसह १ गुणाची आघाडी होती. दिल्लीने १ गुण घेत दोन्ही संघाची गुणसंख्या ३४- ३४ ने बरोबरीत आली. हा सामना ३४-३४ ने बरोबरीत राहिला. त्यामुळे सामन्याचा निकाल टाय ब्रेकरमध्ये लागला. टाय ब्रेकरमध्ये दबंग दिल्लीने ६-४ ने बाजी मारून अंतिम फेरीत प्रवेश केला.